YouTube Live
f LIVE
सह्याद्री न्यूज चॅनेलच्या थेट प्रक्षेपण (LIVE) कार्यक्रमास हजारो प्रेक्षकांनी प्रतिसाद दिल्या त्याबद्दल आभार !!
कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपण (LIVE) साठी संपर्क
9011708840, 9673560360

RNI. MAHMAR/2018/77866

मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

वर्ष ५ | DIGITAL EDITION | शनिवार, दि. १६ जुलै २०२२ | पृष्ठ ४ | मुल्य ५ /- रूपये

# अपघात होऊ नये यासाठी गांभीर्याने काम करा : खा.धानोरकर

## वरिष्ठतम संसद सदस्य रस्ते सुरक्षा समितीची बैठक



**चंद्रपूर/ प्रतिनिधी**
मुख्य रस्त्यावर उभी असलेली जड वाहने, मोकाट जनावरे, दुचाकीवरील स्टंटबाजी आदी कारणांमुळे रस्ते अपघातांची संख्या वाढल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे पोलिस विभाग, वाहतूक शाखा आणि उप-प्रादेशिक परिवहन विभागाने अपघात होऊ नये, यासाठी गांभिर्याने काम करावे, असे स्पष्ट निर्देश खासदार सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांनी दिले.
नियोजन सभागृह येथे केंद्र सरकारच्या वरिष्ठतम संसद सदस्य रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. यावेळी आमदार प्रतिभा धानोरकर, जिल्हाधिकारी अजय गुल्हाने, पोलिस अधिक्षक अरविंद साळवे, मनपा आयुक्त राजेश मोहिते, उप — प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, राज्य परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रक स्मिता सुतावणे आदी उपस्थित होते.
रस्ता सुरक्षा नियंत्रण ही जबाबदारी उप —प्रादेशिक परिवहन विभागाकडे असल्यामुळे त्यांनी संबंधित सर्व विभागांसोबत योग्य समन्वय ठेवावा, असे सांगून खासदार बाळू धानोरकर म्हणाले, आपापल्या कर्तव्यात तत्पर राहा. रस्ते मोठे झाले असून रस्त्यावरील अपघात कसे कमी करता येतील, याबाबत योग्य नियोजन करा. अपघात होण्याचे प्रमाण सायंकाळी ६ ते रात्री ९ या कालावधीत जास्त असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे या कालावधीतच नव्हे तर संपूर्ण ड्युटीच्या वेळी वाहतूक पोलिसांनी रस्त्यावर अतिशय कार्यतत्पर राहावे. बहुतांश वाहतूक पोलिस (पुरुष आणि महिला) मोबाईलवर असल्याचे दृष्टीक्षेपास पडते. त्यांना पोलिस अधिक्षकांनी सुचना कराव्यात.
दुचाकीवर स्टंटबाजी करणा-यांविरूध्द कडक कारवाई करा. विविध मार्गांवर माईल स्टोन, गावाच्या नावाचे फलक, दिशादर्शक फलक लावणे आवश्यक आहे. अपघातासंदर्भात जिल्ह्यातील १८ धोकादायक ठिकाणांवर दर सहा महिन्यात गतीरोधकांवर काळे —पांढरे पट्टे मारावे. ११ वी ते पदवी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी प्रियदर्शनी सभागृहात जिल्हास्तरीय मेळावा घेण्याचे नियोजन करावे. तसेच शहरातील जेटपुरा गेट परिसरातील वाहतूक कोंडी सुरळीत करण्यासाठी समितीचे गठन करावे, अशा सुचना त्यांनी दिल्या.
यावेळी आमदार प्रतिभा धानोरकर म्हणाल्या, अपघातात मदत करण्यासंदर्भात संबंधितांना प्रोत्साहन बक्षीस मिळण्याबाबत गावस्तरावर जनजागृती करावी. जेणेकरून अपघातग्रस्तांचे प्राण वाचविण्यासाठी नागरिक समोर येतील. अनेकजण पोलिस आणि न्यायालयाचा ससेमिरा मागे लागू नये, म्हणून समोर येत नाही. याबाबतही नागरिकांना माहिती द्यावी. वाहतूक पोलिसांनी विनाकारण शेतक-यांच्या मालवाहू गाड्यांना अटकाव करू नये, अशी सुचना त्यांनी केली.

## खासदारांनी घेतला जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीचा आढावा

जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची बैठक खासदार सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन सभागृहात घेण्यात आली. यावेळी आमदार प्रतिभा धानोरकर, जिल्हाधिकारी अजय गुल्हाने, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मिताली सेठी, मनपा आयुक्त राजेश मोहिते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) कपिल कलोडे आदी उपस्थित होते.
यावेळी बोलतांना खासदार धानोरकर म्हणाले, दिनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना व सरल सेल्फ प्रशिक्षण केंद्राद्वारे जास्तीत जास्त युवक — युवतींना प्रशिक्षित करून रोजगार उपलब्ध करून द्यावा. तसेच प्रशिक्षण झाल्यानंतर स्वयंरोजगाराकरीता बँकांनी उमेदवारांना कर्ज उपलब्ध करून द्यावे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेची प्रलंबित कामे त्वरीत पूर्ण करावी. केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेल्या विद्युत समस्यांबाबत दर तीन महिन्यात खासदारांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेणे आवश्यक आहे. तसेच पावसाळ्याच्या दिवसात जेथे वीज पुरवठा वारंवार खंडीत होतो, तेथे कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी विद्युत विभागाने उपाययोजना कराव्यात. सद्यस्थितीत जिल्ह्यात आलेल्या पूर परिस्थितीमध्ये जिल्हा प्रशासनाने केलेल्या कामाचे खासदारांनी कौतुक केले. पुरामुळे विस्थापित झालेल्या लोकांची आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. तसेच वाढती कोरोना रुग्णांची संख्या नियंत्रणात ठेवण्याकरीता आरोग्य विभागाने नियोजन करावे, अशा सुचना खासदारांनी केल्या. यावेळी त्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, दिनदयाल अंत्योदय योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, प्रधानमंत्री आवास योजना आदींचा आढावा घेतला.

# पूरग्रस्त पळसगाव शेतीशिवाराची भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी केली पाहणी

## शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी यासाठी तातडीचे पंचनामे करण्याच्या प्रशासनाला सूचना



**शुक्रवार / प्रतिनिधी**
जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सर्वत्र प्रचंड नुकसान झाले आहे.
बल्लारपूर तालुक्यातील पळसगाव, कोठारी, आमडी, कटवाली, बामणी, कवडजी, किन्ही, कळमना, दहेली व लावरी या गावांतील शेतात पाणी घुसल्याने गेल्या चार दिवसांपासून जवळपास पाचशे हेक्टर शेतजमीन पाण्याखाली आहे. लोकनेते आ. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या सुचनेनुसार आज याठिकाणी प्रत्यक्ष जाऊन भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी शेतशिवाराची पाहणी केली.
ऐणं पेरणी केलेल्या शेतात पाणी तुंबुन असल्यामुळे अंकुरणीवर आलेले बियाणे कुजले आणि हातचे पीक गेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी भरघोस नुकसानभरपाईची मागणी केली. यावेळी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुंबई येथून आभासी पद्धतीने शेतपरीसराची पाहणी केली व शेतकऱ्यांशी सकारात्मक संवाद साधला.
त्यानंतर जिल्हा कृषी अधिकारी, तहसिलदार आणि तलाठी यांना आभासी पद्धतीने शेतपरीसर दाखवून आजचं याठिकाणी पाहणी करून लवकरात लवकर योग्य पंचनामे करावे, अशा सुचना जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी भ्रमणध्वनीहून केल्या.
या भेटीदरम्यान माजी जि. प. सदस्या वैशाली बुद्दलवार, सरपंच संदिप वेटे, उपसरपंच नितीन वांढरे, सुचिता गाले, पुंडलिक उपरे, वासुदेव गाले, बंडू खाडे, विलास वागद्रकर, श्रीहरी इटनकर, अशोक फटाले, मनीषा उपरे, सुरेखा वागद्रकर, रुपेश इटनकर, सूरज रागीट, मनोज इटनकर, रामदास इटनकर, सचिन फटाले, विजय जुमनाके आदिंसह शेतकरी बांधव याठिकाणी उपस्थित होते.



# आमदार किशोर जोरगेवार यांनी केली पुराच्या पाण्याने नुकसान झालेल्या शेतपिकांची पाहणी

## पंचनामा करण्याच्या अधिकाऱ्यांना सुचना



**चंद्रपूर / प्रतिनिधी**
सततच्या पावसाचा शहरी भागासह ग्रामीण भागालाही मोठा फटका बसला असुन अनेकांच्या शेतात पाणी साचल्याने शेतपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तर अनेक घरांचीही पडझड झाली आहे. दरम्याण आज आमदार किशोर जोरगेवार यांनी ग्रामीण भागाचा दौरा करत नुकसानीची पाहणी केली आहे. यावेळी उपस्थितीत अधिकाऱ्यांना आवश्यक सुचनाही आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहे. यावेळी तहसीलदार निलेश गौंड, कृषी अधिकारी भाऊसाहेब भराटी, तालुका कृषी अधिकारी बुक्कावार यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांचीही उपस्थिती होती.
चंद्रपूर जिल्हात झालेल्या मुसळधार पावसामुळे नदी नाले उफाडून वाहत आहे. याचा परिणाम नागरिकांच्या सामन्य जनजीवनावर झाला आहे. शहरी भागासह ग्रामीण भागातही या पावसाची झड पोहचली आहे. नदी-नाल्या काठी असलेले शेत पावसाच्या पाण्याचे प्रभावित झाले आहे. अनेकांच्या शेतात पाणी शिरल्याने शेतपिकांचे मोठे नुकसाण झाले आहे. आज या भागाची आमदार किशोर जोरगेवार यांनी पाहणी केली असुन परिस्थितीचा आढावा घेतला आहे. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी वढा, छोटा नागपूर, पांढरकवडा, विचोरा या गावांना भेट देत येथील पूरपरिस्थीतीची पाहणी केली. येथील नागरिकांची शेती पूर्णतः पाण्याखाली आल्याने मोठे नुकसान झाले असुन शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ ओढावली आहे. तसेच या पावासाने अनेक घरांचीही पडझड झाली आहे. ग्रामस्तांना रुग्णालयात नेण्यासाठी येथे रुग्णवाहीकेची सोय करण्यात यावी, मेडीकल कँम्प लावण्यात यावा, छोटा नागपूर येथील नाल्याचे खोलीकरण करण्यात यावे, नुकसानीचा पंचणामा करुन तात्काळ आर्थिक मदत करण्यात यावी, यासह अनेक आवश्यक सुचना यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी संबंधित विभागाला केल्या आहे. यावेळी छोटा नागपुरच्या सरपंचा चित्रा गानफाडे, वढाचे सरपंच किशोर वरारकर, पांढरकवडाचे सरपंच सुरेश तोतडे, साखरवाही सरपंच नागेश बोंडे, छोटा नागपूरचे उपसरपंच ऋषभ दुपारे, यंग चांदा ब्रिगेडचे ग्रामीण तालुका अध्यक्ष राकेश पिंपळकर, जय मिश्रा, धनराज हणुमंते, संजु बोबडे, मनोहर जाधव, भास्कर नागरकर, प्रविण सिंग, सुर्यभान गानफाडे, भाग्यवान गनफुले, गणेश पाचभाई, सुरज मेघवानी, अमोल आमटे आदिंची उपस्थिती होती.

## पूरामुळे नुकसान झालेल्या सर्व नुकसानग्रस्तांना सरसकट आर्थिक मदत द्या - आ. किशोर जोरगेवार

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदनाच्या माध्यमातुन मागणी**

आठवडा भरापासून चंद्रपूरात सुरु असलेल्या पावसामुळे चंद्रपूरात पुरपरिस्थिती निर्माण झाली आहे. पुराचे पाणी नागरिकांच्या घरात शिरल्याने अनेकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे तत्काळ पंचणामे करुन नुकसाणग्रस्तांना सरसकट आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी निवेदनाच्या माध्यमातुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली आहे.
चंद्रपूर शहरात मागील काही दिवसांपासून संतत मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे शहरातील अनेक घरांची पडझड होऊन नागरिकांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. घरांची पडझड झाल्याने कित्येक कुटुंब उघड्यावर आलेले आहेत. सोबतच नदी आणि नाल्यांच्या काठावर असणार्या घरात पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. शासन धोरणाप्रमाणे पूर परिस्थितीत नुकसाण झालेल्या घरांना नूकसाण पाहता ५ ते ९५ हजार रु. आर्थिक मदत देण्याबाबतचे निणऱ्य आहे. परंतु हे निणऱ्य फक्त जागेचा पट्टा असलेल्या जागाधारकांच्या घराबाबत आहे. मात्र चंद्रपूर शहरातील बहुतांश कुटुंबीयांचे घरे हि महसूल व वेकोलि च्या जागेवर बांधलेली आहे. त्यांच्याकडे कायमस्वरूपी जागेचे पट्टे नसल्याने सदर पिडीत कुटुंब शासन निकषानुसार पडलेल्या घरांकरिता मिळणाऱ्या आर्थिक मदतीपासून वंचित राहणार आहे. त्यामुळे शासकीय निकषामध्ये विशेष बाब अंतर्गत शिथिलता देऊन महसूल व वेकोलि च्या जागेवर बांधलेल्या घरांनाही आर्थिक मदतीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी सदर निवेदनाच्या माध्यमातुन आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली आहे. तसेच चंद्रपूर शहरातील पूर परिस्थितीवर सहानभूतीपूर्वक विचार करून सर्व नुकसानग्रस्त कुटुंबियांना सरसकट आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणही या निवेदनात आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

# पूरग्रस्तांना जास्तीत जास्त मदत करण्याला सर्वोच्च प्राधान्य : आ. सुधीर मुनगंटीवार

## संवेदनशीलपणे पंचनामे करण्याचे प्रशासनाला निर्देश



**चंद्रपूर, / प्रतिनिधी**
संपूर्ण महाराष्ट्रासह चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातही पावसाच्या संततधारेमुळे पूर परिस्थिती अतिशय बिकट झाली. या पुराचा सर्वाधिक फटका गरीब कुटुंबाना बसला असून अनेकांच्या घरात पाणी घुसले. परिणामी त्यांना सुरक्षित स्थळी स्थलांतरीत व्हावे लागले. पावसाच्या पाण्याबरोबर नागरिकांच्या डोळ्यातही अश्रु आहेत. त्यामुळे या संकटाच्या काळात जिल्ह्यातील पूरग्रस्त नागरिकांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्याला आपले सर्वोच्च प्राधान्य आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाला सूचना केल्याचे विधीमंडळ लोकलेखा समितीचे अध्यक्ष तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.
जिल्हाधिकारी कार्यालयात पूर परिस्थतीचा आढावा घेतांना मुंबईवरून दूरदृश्य प्रणालीद्वारे ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी अजय गुल्हाने, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मिताली सेठी, पोलिस अधिक्षक अरविंद साळवे, अतिरिक्त जिल्हाधिकारी विद्युत वरखेडकर, निवासी उपजिल्हाधिकारी विशालकुमार मेश्राम, अधीक्षक अभियंता (सा.बा.वि.) संध्या साखरवाडे, संध्या चिवंडे (विद्युत कंपनी), मनपा आयुक्त राजेश मोहिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार गहलोत आदी उपस्थित होते.
या पूर परिस्थितीत नागरिकांच्या घरांचे, शेतीचे तसेच पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, असे सांगून आ. मुनगंटीवार म्हणाले, हा संकटाचा काळ आहे. काही नागरिकांची घरे अंशतः पडली असली तरी पूर ओसरल्यानंतर मातीची घरे काही दिवसांनी पडू शकतात. त्यामुळे कोणताही भेदभाव न करता नागरिकांचे अश्रू पुसण्यासाठी संवेदनशीलपणे पंचनामे करा. जेणेकरून त्यांना जास्तीत जास्त मदत करता येईल. शहरातील वस्त्यांमधून पाणी ओसरल्यानंतर साथरोग पसरण्याची शक्यता असते. त्यामुळे महानगर पालिका तसेच स्थानिक पालिकेने आपापल्या भागात साफसफाई अभियानासोबतच ब्लिचिंग पावडरची फवारणी, मच्छर निर्मूलनाकरिता स्प्रेइंग, परिसरातील विहिरींमध्ये ब्लिचिंग पावडर, पोटॅशियम परमँगनेट, तुरटी फवारणे आदी उपाययोजना कराव्यात. तसेच आरोग्य विभागाने डासाच्या उत्पत्तीपासून होणारे मलेरिया, डेंग्यू आदी रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी फिरते आरोग्य पथके कार्यान्वित करावी.
पायाभुत सुविधांच्या झालेल्या नुकसानीबाबत ते म्हणाले, वीज, रस्ते, विद्युत खांब, ट्रान्सफार्मर, ग्रामीण भागातील रस्ते, राष्ट्रीय व राज्य मार्गावरील पुल, ग्रामीण भागातील छोटे पुल व रपटे, बंधाऱ्यांची पुनर्बांधणी आदींचे जे नुकसान झाले आहेत, त्याबाबत तातडीने माहिती गोळा करून अहवाल सादर करावा. जेणेकरून शासनाकडे निधीची मागणी केली जाईल. तसेच ज्या गावांचे पुनर्वसन करायचे आहे, त्याचीही माहिती द्यावी, अशाही सुचना त्यांनी दिल्या.
यावेळी त्यांनी सर्व तहसीलदारांकडून आपापल्या भागातील पूर परिस्थिती, तसेच तालुका प्रशासनाने काय उपाययोजना केल्या याबाबत माहिती जाणून घेतली. जिल्हा प्रशासनाच्या उपाययोजनेबाबत जिल्हाधिकारी अजय गुल्हाने यांनी माहिती दिली. बैठकीला सर्व विभागाचे विभागप्रमुख यांच्यासह दूरदृष्य प्रणालीद्वारे जिल्हा व तालुक्यातील पदाधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

- ज्या नागरिकांना आपली घरे सोडून इतरत्र आसारा घ्यावा लागला आहे, अशा नागरिकांची जेवणाची चांगली व्यवस्था, पिण्याचे स्वच्छ पाणी, आदी बाबी प्रशासनासोबत स्थानिक पदाधिका-यांनीसुध्दा उपलब्ध करून द्याव्यात. आपापल्या घरी परत गेल्यावर लगेच त्यांचा संसार सुरू होऊ शकत नाही, अशावेळी त्यांना जीवनावश्यक कीटचा पुरवठा करावा. ज्यांची घरे पडली आहेत किंवा पडण्याच्या अवस्थेत आहेत, त्यांना कुठे जायचे याबाबत माहिती नसते. त्यामुळे अशा लोकांसाठी टोल फ्री क्रमांक प्रसारीत करावा.
- कोणत्याही परिस्थतीत नियंत्रण कक्षाचे संपर्क क्रमांक बंद असता कामा नये. या संकटाच्या काळात कोणत्याही व्यक्तीच्या मनात एकटा असल्याची भावना निर्माण होऊ देऊ नका. प्रशासनासोबतच लोकप्रतिनिधी आणि स्थानिक पदाधिका-यांनी लोकांच्या मदतीला धावून जावे, असे आवाहन त्यांनी केले.
- पंचनामे करतांना तहसीलदार, पटवारी, तलाठी यांनी संकुचितपणा न करता दिलदारपणे वागावे. नागरिकांना मदत मिळवून देऊ, अशी भावना कामामध्ये दिसणे आवश्यक आहे. अंशतः घर पडले असले तरी त्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा केला जाईल. शासन निणऱ्यात बदल करावयाचा असल्यास तो प्राधान्याने करू, अशी ग्वाही आ. मुनगंटीवार यांनी दिली.

# पेट्रोल डिझेलवरील व्हॅट कमी केल्यामुळे सामान्य जनतेला दिलासा

## भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांची प्रतिक्रिया

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
पेट्रोल आणि डिझेलवरील मूल्यवर्धित करात (व्हॅट) कपात करत पेट्रोल आणि डिझेल अनुक्रमे ५ आणि ३ रुपयांनी स्वस्त करण्याच्या राज्य सरकारच्या निणऱ्याचे चंद्रपूर भारतीय जनता पार्टीचे जिल्हा अध्यक्ष देवराव भोंगळे यांनी स्वागत केले आहे.
एका प्रसिद्धी पत्रकात देवराव भोंगळे यांनी म्हटले आहे की, केंद्र सरकारने पेट्रोल डिझेलवरील उत्पादन शुल्कात दोनदा कपात केली. त्याचवेळी भारतीय जनता पार्टीने राज्यात सत्तेत असलेल्या तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने पेट्रोल डिझेलवरील व्हॅटमध्ये कपात करावी अशी मागणी सातत्याने केली होती. केंद्र सरकाच्या निणऱ्याचे अनुकरण करत भारतीय जनता पार्टीची सत्ता असलेल्या राज्य सरकारांनी इंधनावरील करात कपात केली होती. महाविकास आघाडी सरकारने मात्र इंधनावरील व्हॅट कमी करण्याच्या भारतीय जनता पार्टीच्या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष केले.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्तेत आल्या-आल्या इंधनावरील व्हॅटमध्ये कपात करत सामान्य जनतेला मोठा दिलासा दिला आहे. या निणऱ्याबद्दल भारतीय जनता पार्टी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करत आहे, असेही देवराव भोंगळे यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.
केंद्र आणि राज्य यांच्या सहकार्याचे नवे पर्व महाराष्ट्रात सुरू झाले असून 'सबका साथ, सबका विकास' हा पंतप्रधान मोदी यांचा मंत्री शिंदे व फडणवीस यांच्या नेतृत्वा खालील महाराष्ट्राच्या विकासाला नवी गती देईल असा विश्वास देवराव भोंगळे यांनी व्यक्त केला.

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार

# जलशक्ती अभियानना अंतर्गत केंद्रसरकारच्या पथकाकडुन पाहणी

**गडचिरोली / प्रतिनिधी**
जिल्हयात विविध यत्रणांनी जलशक्ती अभियान अंतर्गत जलसंधारणाची उत्तम कामे केलेली असून त्यांना अधिक गती देण्याची गरज आहे व भूगर्भातील भूजलपातळी वाढविण्यासाठी प्रयत्न करावे असे सुचविले. तसेच वैज्ञानिक दृष्टीकोन व स्थानिक नागरीकांच्या अनुभवांची त्यांना सांगड घातल्यास जलसंवर्धनाचे काम अधिक जोमाने होईल असे प्रतीपादन केंद्र सरकारच्या जलशक्ती अभियानाचे केंद्रीय अधिकारी कुणाल कुमार
सह सचिव भारत सरकार यांनी केले. गडचिरोली येथे नियोजन भवन येथे आज आयोजीत आढावा सभेत ते बोलत होते. या प्रसंगी संजय मिणा, जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी जिल्हयात सुरु असलेल्या जलशक्ती अभियान अंतर्गत कामाबाबत विस्तृत माहिती दिली व भुवैज्ञानक तसेच जीआयएस तज्ञ यांचे कडुन जिल्ह्याचा आराखडा तयार करण्याच्या सुचना सर्व उपस्थित यंत्रणा प्रमुख यांना दिल्या.



कुमार आशीर्वाद मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. गडचिरोली यांनी सुचविले की, जलजीवन मिशन अंतर्गत काम करण्यात आलेल्या गावात जेथे पाणी पातळी खोलवर आहे अशा ३० ते ३२ गावात प्राधान्याने जलसंवर्धन व पुनर्भरणाची कामे घेण्यात यावी.
आढावा सभेनंतर केंद्रीय पथकाने गडचिरोली येथील जलशक्ती केंद्रास भेट दिली. तसेच गडचिरोली जिल्हयातील मौजा. पोर्ला येथील परिसरात झालेल्या जलसंधारणाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. याप्रसंगी त्यांच्या सोबत कुमार आशिर्वाद मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. गडचिरोली, फणी कुमार वैज्ञानिक तथा तांत्रिक अधिकारी जलशक्ती अभियान, पी. एम. इंगोले जिल्हा जलसंधारण अधिकारी (मृ.व जसं.) विभाग गडचिरोली, चौधरी जिल्हा जलसंधारण अधिकारी, ल.पा. जि.प. गडचिरोली, तुरकर कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) जि.प. गडचिरोली, आणि माणिक चव्हाण उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा) जि.प. गडाचरोली हे उपस्थित होते.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा सादरीकरण पी. एम. इंगोले जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग गडचिरोली यांनी केले, तर आभार प्रदर्शन फर्नेंद्र कुत्तीरकर उप-मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. गडचिरोली यांनी केले.

# अतिवृष्टी व पुराने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई द्या

## आमदार सुभाष धोटे यांची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी.

**राजुरा / प्रतिनिधी**
राज्यात गेली ५ ते ६ दिवसापासुन सतत सुरू असलेल्या पावसामुळे जनजिवन विस्कळीत झाले आहे. चंद्रपुर जिल्हात अनेक ठिकाणी ढग फुटी झाली. पाऊस मोठ्या प्रमाणात पडल्यामुळे शेतातील उभी पिके जमिनीत गाळल्या गेली आहेत. अति पाऊसामुळे शेती खरवळून गेली असुन शेती करण्यायोग्य राहलेली नाही. नुकतीच काही दिवसापूर्वी पेरणी झाल्याने पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यावर दुबार पेरणीची वेळ उद्भवलेली आहे. चंद्रपुर जिल्हातील ग्रामिण भागात नाले ओसंडुन वाहत असल्यामूळे अनेकांच्या घरात



पुराचे पाणी गेले असुन जिवनावश्यक वस्तु पाण्यात बुडाल्याने अनेक कुटुबियांवर उपासमारीची वेळ उद्भवलेली आहे. अतिवृष्टीमुळे अनेकांची कच्ची घरे पडल्याने त्यांना निवासाची समस्या निर्माण झाली आहे.
राजुरा मतदार संघतील तालुक्यामध्ये राजुरा ४८८.०१ मी.मी. कोरपना ६५६.०८ मी.मी, गोंडपिपरी ५४५.०९ मी.मी जिवती ८८५.०६ मी.मी पाऊस पडल्याने मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होऊन फारमोठे नुकसान झाले आहे. करीता राजुरा मतदार संघातील राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी तालुक्यामधील अतिवृष्टी व पुरपरीस्थितीमुळे नुकसान झालेल्या परिसराचे सर्वेक्षण करून संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व इतर नागरीकांना सरसकट नुकसान भरपाई मिळणेसंदर्भाने तातडीची योग्य कार्यवाही करून मदत करावी अशी मागणी आमदार सुभाष धोटे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# पराभव समोर दिसत असल्यानेच राज्य सरकारने सहकारी संस्थांच्या निवडणुका स्थगित केल्या : किसान सभा

**अहमदनगर / प्रतिनिधी**
पावसाचे कारण देत राज्य सरकारने सहकारी संस्थांच्या निवडणुकांना स्थगिती देण्याचा निर्णय घेतलेला आहे. राज्यभरात वेगवेगळ्या कारणाने अनेक सहकारी संस्थांच्या निवडणुका सातत्याने पुढे ढकलण्यात आलेले आहेत. आता सुरु असलेल्या निवडणुकांचा प्रचार अंतिम टप्प्यात आलेला आहे. अनेक संस्थांच्या निवडणुकांमध्ये केवळ मतदानाची प्रक्रिया बाकी आहे. अशा परिस्थितीमध्ये अचानक निवडणुका पुढे



राज्य सरकारने तातडीने आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करावा व सहकारी संस्थेत लोकशाही बळकट करण्यासाठी निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन किसान सभेच्या वतीने राज्य सरकारला करत आहोत.
**डॉ. अजित नवले**
**सरचिटणीस**
**अखिल भारतीय किसान सभा, महाराष्ट्र**

ढकलल्या ही अत्यंत लोकशाहीविरोधी कृती आहे. हा सत्तेचाही दुरुपयोग आहे.
राज्यभरातील अनेक सहकारी संस्थांमध्ये भाजपला आपला पराभव दिसत असल्यामुळेच शिंदे भाजपा सरकारने हा लोकशाही विरोधी निर्णय घेतलेला आहे. किसान सभेच्या वतीने राज्य सरकारच्या या निणऱ्याचा आम्ही धिक्कार करत आहोत.

## आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याचे फलीत.

# रब्बी धान खरेदीसाठी राज्य शासनाने दिली मुदतवाढ

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
पणन हंगाम २०२१-२२ (रब्बी) मध्ये किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धान खरेदीसाठी १५ जुलै २०२२ पर्यंत पुर्ण करण्याचे निर्देश अभिकर्ता संस्थांना देण्यात आले होते मात्र सद्यःस्थितीत अतिवृष्टीमुळे धान खरेदी काही प्रमाणात कमी झाली आहे. त्यामुळे धान खरेदीची मुदत वाढविण्याची मागणी माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे केली होती. त्याअनुषंगाने अन्न व नागरी पुरवठा विभागाने दिनांक १५ जुलै २०२२ रोजी धान खरेदीला मुदतवाढ दिली आहे.
अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या दिनांक ३ जुलै २०२२ च्या पत्रान्वये रब्बी धान खरेदी करण्याकरिता केंद्र शासनाने दिलेल्या मंजूरीनुसार धान खरेदी करण्याकरिता म.रा. सहकारी आदिवासी विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन मुंबई यांना दिनांक १५ जुलै २०२२ पर्यंत मुदत दिली होती. राज्यात विशेषतः धान उत्पादक जिल्हयांमध्ये सध्या मोठया प्रमाणावर अतिवृष्टी व संततधार पाऊस सुरू असल्याने धान खरेदीला त्याचा फटका बसला आहे. ही बाब लक्षात घेता धान खरेदीला मुदतवाढ देण्याची मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे केली होती. त्यानुसार केंद्र शासनाने दिलेल्या उद्दिष्टापैकी शिल्लक राहिलेल्या धानाची खरेदी करण्याकरिता दिनांक २२ जुलै २०२२ पर्यंत अभिकर्ता संस्थांना रब्बी हंगाम सन २०२१-२२ करिता दिलेले धान खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल तोपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. सदर मुदतीत धान खरेदी पूर्ण करण्याची जबाबदारी दोन्ही अभिकर्ता संस्थांची राहील असेही शासनाने स्पष्ट केले आहे. या निणऱ्यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयबद्दल आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त केले आहे.

## वाघाच्या हल्ल्यात वृद्धशेतकऱ्यासह बैल ठार

**चिमूर** : चिमूर तालुक्यातील खडसंगी वन परीक्षेत्र किटाळी बिट अलिझंजा कक्ष क्रमांक ३९० मध्ये दबा धरूण असलेल्या वाघाने शुक्रवारला सांयकाळी ४.०० च्या सुमारास हल्ला करून वृद्ध शेतकऱ्यासह त्याच्या एका बैलास केले ठार. मृत शेतकऱ्याचे नाव सिताराम रामजी नन्नावरे अंदाजे वय ७० वर्ष रा.किटाळी असे असुन हल्यातुन १ बैल बचावला असुन जखमी झाला आहे. चिमूर तालुक्यात वण्यप्राणी व मानव संघर्ष वाढलेले आहे.

# पुरात अडकलेल्या ट्रक चालक व वाहकांना मसालाभाताचे वाटप



**राजुरा / प्रतिनिधी**
शहरात मागील एक आठवड्यापासून पावसाची जोरदार बॅटिंग सुरू असून अनेक शेतात पाणी साचले आहे.सततच्या संततधार पावसामुळे नदीनाले ओसंडून वाहत आहे.त्यामुळे पूर आला असून राजुरा-चंद्रपूर मार्ग बंद झाला आहे.वाहतूक बंद असल्याने अनेक वाहने अडकुन पडले आहे.मागील तीन दिवसांपासून ट्रक च्या चालक व वाचकांची खाण्यापिण्याची गैरसोय होत असल्याने राज उर्फ लडू पाटील यांनी मसालाभात देऊन सामाजिक कार्य केले आहे.
.राजुरा वरून गडचांदूर व तेलंगणा राज्याकडे जाणारे दोन राज्यमार्ग आहे.या दोन्हीही राज्यमार्गावरून वाहनांची मोठी वर्दळ सुरू असते.पण मागील एक आठवड्यापासून पावसाचा जोर वाढल्याने नदी नाले तुडुंब भरले आहे.त्यामुळे पूर आला असून वर्धा नदी पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. त्यामुळे शेकडो वाहने अडकून पडले आहे. तीन दिवसांपासून चालक व वाहकांच्या खाण्यापिण्याची गैरसोय होत आहे.त्यांची भूक भागविण्यासाठी राज पाटील यांनी मसालाभाताचे वाटप केले आहे.त्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत अन्नदानाचे कार्य केले आहे.त्यांच्यासोबत अनिकेत लांजेवार, भारत बानकर, सुरज सदाफडे, विनोद शेंडे, किशोर नारलेवर, सुरज कोटरांगे, अरुण कावळे, योगेश नारलेवार यांनी मोलाची मदत केली आहे.

# चंद्रपूर जिल्हयातील राष्ट्रीय महामार्गाची कामे त्वरीत पूर्ण करा : आ. मुनगंटीवार

## आभासी बैठकीत अधिकाऱ्यांना दिले निर्देश.

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
आ. सुधीर मुनगंटीवार यांनी आज आभासी बैठकीत चंद्रपूर-मुल व चंद्रपूर-कोठारी या रस्त्यांसंदर्भात राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी व भाजपाचे पदाधिकारी यांच्यासोबत आढावा घेतला. यावेळी चंद्रपूर-मुल रस्त्यावर अनेक कामे अजुनही पूर्ण झाली नाहीत याकडे पदाधिकाऱ्यांनी लक्ष वेधले. ज्यामध्ये प्रामुख्याने चंद्रपूर शहरातील रस्त्यांवरील विज व्यवस्था, गट्टू लावणे, सावरकर चौकातील सौंदर्यीकरण या प्रमुख मुद्द्यांचा समावेश होता. यापैकी सावरकर चौकातील सौंदर्यीकरण १५ ऑगस्ट २०२२ पर्यंत पूर्ण करून त्यांचे उद्घाटन करण्याचे निर्देश आ. मुनगंटीवार यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले. चंद्रपूर शहराबाहेर मुलपर्यंत अनेक ठिकाणी नाल्यांची आवश्यकता आहे, परंतु वनविभाग त्याची परवानगी



देत नाही असे राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकारनांनी सांगीतले. त्यावर निर्देश देताना आ. मुनगंटीवार यांनी कार्यकारी अभियंता व पदाधिकाऱ्यांना ताबडतोब वनअधिकाऱ्यांना भेटून यासंदर्भातील अडचणी दूर करण्यास सांगीतले. चंद्रपूर-मुल रस्त्यावरील मच्छीनाला पुल अतिशय निकृष्ट दर्जाचे असल्याचे पदाधिकारनांनी निदर्शनास आणून दिले. यावर त्याठिकाणी सुध्दा अधिका-यांनी व पदाधिकाऱ्यांनी एकत्रीत भेट द्यावी व उपाययोजना करावी असे निर्देश आ. मुनगंटीवार यांनी दिले. कोठारी गावात रस्ता दुभाजक, विद्युत पथदिवे, दोन्ही बाजूने नाले व पेव्हर ब्लॉक बांधण्यासाठी साडेपांच कोटी रूपयांचा प्रस्ताव वरीष्ठ अधिका-यांकडे पाठविल्याचे कार्यकारी अभियंत्यांनी सांगीतले. त्यावर त्या अधिका-याशी या कामाच्या पाठपुराव्याची जबाबदारी पदाधिकाऱ्यांकडे यावेळी आ. मुनगंटीवार यांनी दिली. एकंदरीत चंद्रपूर-मुल रस्त्याच्या कामाची चौकशी करून त्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश आ. मुनगंटीवार यांनी दिले. या बैठकीला भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. मंगेश गुलवाडे, राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता मिश्रा, उपकार्यकारी अभियंता बोबडे, परिवहन अधिकारी मोरे, माजी महापौर अंजली घोटेकर, महानगर उपाध्यक्ष रामपाल सिंह, माजी जि.प. सदस्य गौतम निमगडे व शासकीय अधिकारी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथे शालेय मंत्रिमंडळ व मीना राजू मंचची स्थापना



**कोरपना / प्रतिनिधी**
पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथे मंत्रिमंडळाची निवडणूक लोकशाही पद्धतीने नुकतीच पार पडली .यामध्ये मुला मुलींनी सहभाग घेतला लोकशाही पद्धतीने निवडणूक प्रक्रिया कशी पार पाडली जाते याचे प्रात्यक्षिक पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली सदर निवडीमध्ये वर्ग सहावीचा विद्यार्थी साहिल उरकुडे याला सर्वाधिक मते मिळाली त्याची मुख्यमंत्री म्हणून तर यश पिंपळकर याला दुसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक मते मिळाल्यामुळे त्याची उपमुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली तसेच शाळा स्तरावर मुला मुलींमध्ये भेदभाव होऊ नये व सर्वांना समान वागणूक मिळावी यासाठी मीना राजू मंच काम करते, त्यासाठी मीना राजू मंचाची प्रमुख म्हणून कुमारी लोकेश्वरी भोंगळे तर कुमार तुषार पिंगे याची मीना राजू मंचाकरिता निवड सर्वांमध्ये करण्यात आली सदर कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता शाळेचे उच्च श्रेणी मुख्याध्यापक श्री सखाराम खर्चके विषय शिक्षक वसंत गोरे शिवाजी माने अशोक पढाल तसेच सहाय्यक शिक्षक सुरेश टेकाम अनिल राठोड काकासाहेब नागरे नितीन झुलमे यांनी परिश्रम घेतले.

# शासकीय कोविड लसीकरण केंद्रावर आता प्रतिबंधात्मक डोज मोफत

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
केंद्र व राज्य सरकारच्या सुचनेनुसार १५ जुलै ते ३० सप्टेंबर २०२२ (७५ दिवस) या कालावधीमध्ये 'कोविड व्हॅक्सिन अमृत महोत्सव' अंतर्गत सर्व शासकीय कोविड लसीकरण केंद्रावर प्रतिबंधात्मक (बुस्टर) डोज आता मोफत मिळणार आहे. १८ वर्षावरील नागरिकांनी त्यांच्या कोविड लसीच्या दुस-या डोजनंतर ६ महिने किंवा २६ आठवड्यांचा कालावधी पूर्ण केलेला असावा. जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी प्रतिबंधात्मक डोज घेऊन स्वतःला सुरक्षित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष अजय गुल्हाने यांनी केले आहे.कोविड व्हॅक्सिन अमृत महोत्सवाअंतर्गत जास्तीत जास्त लाभार्थ्यांना प्रतिबंधात्मक लस देण्यासाठी शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, मॉल्स, आठवडी बाजार आदी ठिकाणी विशेष लसीकरण शिबिरांचे आयोजन करावे. गणेशोत्सवादरम्यान सर्व गावांमध्ये गणेश मंडळांच्या सहाय्याने लसीकरण शिबिर घेण्यात यावे.

# राज्यात वीज दरवाढ करून वीजेचा शॉक देणे बंद करा : आपची मागणी

## सरपंच संघटनेचे अध्यक्ष प्रदिप महाकुलकर यांची मध्यस्थी

**राजुरा / प्रतिनिधी**
आम आदमी पक्ष राजुरा शाखेच्या वतीने तहसिलदार यांचे मार्फत मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दि.१३ जुलै २०२२ रोजी तालुका अध्यक्ष रोशन येवले व राजुरा शहर अध्यक्ष रीयाज शेख यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. २०० युनीट वीज मोफत देऊ असे आश्वासन निवडणूक पुर्व जाहिरनामात दिले गेले होते. याची आठवण करून देण्यात आली. विदर्भात चंद्रपूर येथे आशियातील सर्वात मोठे वीज निर्मिती केंद्र उपलब्ध असल्याने तेथील जनतेला वीजेच्या दरात सुट मिळणे अपेक्षित आहे. २०० युनीट वीज मोफत देणे अपेक्षित असतांनाही युतीच्या काळात वीजेच्या दरात वाढ करून वीज ग्राहकांना शॉक देणे चालूच आहे. याचा तिव्र निषेध आम



आदमी पार्टीने यावेळी पक्षाने केला आहे.
सर्वाधीक महाग वीज महाराष्ट्रात विकली जात आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वीज वाहून नेत असतांना वीजेची जी गळती होत असते याचा भार सर्व ग्राहकांवर टाकला जात आहे. जे चुकीचे आहे. त्या भागात वीज निर्मिती होते आहे त्या भागातील वीज ग्राहकांवर वीज वहनाचा आकार हा आकारला जात आहे. वीज चोरी करणारे दुसरेच असतांना वीज चोरीचा अतिरिक्त भार हा ग्राहकांकडून वसूल केला जात आहे. शेतकऱ्यांची स्थिती तर अजूनच वाईट आहे. शेतीवरील पंपाचा शेतीसाठी वापर न करताही त्यांना मोटरच्या एचपी नुसार वीजेचे बिल दिले जात आहे सरसकट बिलाची आकारणी केली जात आहे. वीज नियामक मंडळाकडे वीज आकारणीचे काम असल्याने ते

**आम आदमी पक्ष राजुरा शाखेच्या वतीने मा. तहसिलदार यांचे मार्फत मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दि. १३ जुलै २०२२ रोजी तालुका अध्यक्ष रोशन येवले व राजुरा शहर अध्यक्ष रीयाज शेख यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. २०० युनीट वीज मोफत देऊ असे आश्वासन निवडणूक पुर्व जाहिरनामात दिले गेले होते. याची आठवण करून देण्यात आली .विदर्भात चंद्रपूर येथे आशियातील सर्वात मोठे वीज निर्मिती केंद्र उपलब्ध असल्याने तेथील जनतेला वीजेच्या दरात सुट मिळणे अपेक्षित आहे.**

जागेवर बसून वीज आकारत असतात. याचा शॉक वीज ग्राहकांना बसतो आहे. बहुतांश शेती पंपावर वीजेचे मिटर लावलेले नसल्याने वैयक्तिक वीजेचा वापर लक्षात न घेता सरसकटपणे वीजेचे शुल्क हे सर्वांनाच आकारले जात आहे. अशी माहिती वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली आहे. या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी तहसिलदार राजुरा यांचेमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. याप्रसंगी तालुका अध्यक्ष रोशन येवले, शहर अध्यक्ष रियाज शेख, प्रकाश ताजणे, सचिव पवन ताकसांडे, संघटक स्वप्निल कोहपरे, कोषाध्यक्ष रामदास धानोरकर, जेष्ठ सदस्य मिलिंद गड्डमवार, तौफिक शेख, संजय कोपलवार, विकास मालेकर, इम्रान शेख, राहूल चांदेकर इ.ची उपस्थिती होती. यावेळी सर्वत्र पुराने थैमान घातल्याने तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, नायब तहसीलदार यांची भेट होवू शकली नाही. करीता निवेदन हे आवक-जावक विभागाकडे देऊन मुख्यमंत्री याना पाठविण्यात आले.

# वृक्षारोपण करून केले उद्घाटन पावसापेक्षाही विद्यार्थ्यांचा आनंद अधिक ओसंडला

**राजुरा / प्रतिनिधी**
आधुनिक काळात शिक्षण क्षेत्रही अत्याधुनिक व्हावे ह्या उदात्त हेतुने व आपली आई स्व. छायाताई खणगण ह्यांनी त्या काळात घातलेला शिक्षणाचा वसा कायम रहावा ह्या उद्देशाने संचालक विनोद खंगण व मुख्याध्यापिका नम्रता खणगण ह्यांच्या शैक्षणिक ध्यासातून राजुरा शहरात देशाची भावी पिढी तंत्रस्नेही होण्यासाठी माय खणगण स्कुल नावाने इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करण्यात आली असुन ४ जुलै २०२२ रोजी भारतीय शिक्षण मंडळाच्या उपाध्यक्षा तथा माजी मुख्याध्यापिका स्वाती देशपांडे ह्यांच्या अध्यक्षतेखाली, गटशिक्षणाधिकारी मनोज गौरकर ह्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. ह्या कार्यक्रमाला माजी नगरसेवक अशोक देशपांडे ह्यांचेसह इनरव्हील क्लब माजी अध्यक्षा स्वरुपा झंवर, ज्येष्ठ नागरिक यशवंत देशपांडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता वैभव जोशी ह्यांची विशेष उपस्थिती होतीपारंपरिक पद्धतीने मान्यवरांनी दीप प्रज्वलन करून





शुभांगी वाटेकर ह्यांच्या सुमधुर सरस्वती वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. महत्वाचे म्हणजे शाळेत प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या हस्ते विविध फुलझाडे लावण्यात आली असुन विद्यार्थ्यांना बालवयातच निसर्गप्रेम, वृक्ष संवर्धन तसेच उत्तम संस्कार व जबाबदारीची जाणिव व्हावी ह्या हेतूने झाडांचे संवर्धन बालकांच्या हस्ते करण्यात येणार असल्याचे मुख्याध्यापिका नम्रता खंगण ह्यांनी सांगितले आहे.शाळेच्या उद्घाटन सोहळ्याच्या वेळी मुसळधार पाऊस पडत असूनही विद्यार्थी व पालकांना उत्साह ओसंडून वाहत होता. शाळेच्या शिक्षिका सना शेख, मोनिका ईप्पावार, आम्रपाली देवगडे ह्यांनी प्रवेशित चिमुकल्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. विविध खेळांची साहित्य तसेच सेल्फी पॉइंटवर विद्यार्थ्यांची झुंबड उडाली होती. गटशिक्षणाधिकारी मनोज गौरकर ह्यांनी आपल्या संबोधनत सांगितले की, आजच्या काळात शालेय स्पर्धा भरपुर वाढल्या आहेत आणि यामुळे शिक्षणाचा स्तर वाढविणे अत्यंत आवश्यक असून विद्यार्थ्यांना स्पर्धेत टिकवायचे असेल तर पालकांसोबत शिक्षकांची भुमिका महत्वाची ठरणार असल्याने शाळेत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून शैक्षणिक पातळी वाढविणे व त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अत्यावश्यक ठरला आहे.